**नियमित दिवाणी दावा क्र. ०१/२०२५**

( CNR NO.MHNS130000122025)

आशियाना पठाण वि.आयुब पठाण व इतर

**निशाणी क्र.११ खालील आदेश**

१.  प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला “एकतर्फा ” आदेश रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२.  प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे असे कथन केले की, समन्स बजावणी वेळी प्रतिवादी घरात हजर नव्हते. त्यावेळी त्यांचे नातेवाईक घरी हजर असल्याने त्यांनी समन्स घेण्याचे नाकारले. या कारणास्तव प्रतिवादी विरुद्ध एकतर्फा हुकुम पारित करण्यात आलेला आहे. सबब, सदरचा हुकुम रद्द न केल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. म्हणुन अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

३.  वादींनी प्रस्तुत अर्जास विरोध करुन आक्षेप नोंदविला की, अर्ज खोटा व बनावट असुन प्रतिवादी हे मुद्दाम हे सदर दाव्यात उशीराने हजर झाले. यामुळे न्यायालयाचा अमुल्य वेळ वाया गेला. म्हणुन अर्ज खर्चासह नामंजुर करावा.

४.  दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश:

# <u>आदेश</u>

१. अर्ज नि.क्र. ११ प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीस ३००/– रुपये खर्च या अगर पुढील तारखेस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द झालेला “एकतर्फा” आदेश त्यांनी वर नमुद खर्चाची रक्कम वादीस अदा केल्यानंतर रद्द करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.04.07 17:30:20 +0530

(पी.डी. कोळेकर)

दिनांकः– ०७ /०४/२०२५

दिवाणी न्यायाधिश क. स्तर.,
पिंपळगांव बसवंत